## नर्मदा विकास विभाग, नंदुरबार कार्यालयाचे कार्यक्षेत्र

1.0 सरदार सरोवर प्रकल्पाच्या बुडीताखाली येणा-या महाराष्ट्र राज्यातील प्रकल्प बाधितांचे स्थलांतर करणे, महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत होणा-या प्रकल्पबाधितांना नागरी सुविधा पुरविणे, तसेच त्या प्रकल्पबाधितांना वाटपकेलेल्या जिरायती शेतीसाठी सिंचन सुविधा पुरविणे इ. कामांसाठी जलसंपदा विभागामार्फत नर्मदा विकास विभाग, नंदुरबार हे कार्यालय नंदुरबार येथे कार्यरत आहे.

2.0 सरदार सरोवर प्रकल्प हा गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व राजस्थान या चार राज्यातील आंतरराज्यीय, बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत नर्मदा नदीवर गुजरात राज्यात भडोच जिल्हयातील नवागाव येथे 1276 मी. लांबीचे व 129 मी. उंचीचे कॉंक्रिटचे धरण आहे. सदर धरणाव्दारे 17.92 लक्ष हेक्टर शेत जमिनीस सिंचनाचा लाभ होईल. सदर प्रकल्पातून 1450 मे.वॅ. विद्युत निर्मिती होणार असून त्यात महाराष्ट्रचा हिस्सा 27% म्हणजे 392 मे.वॅ. वीज उपलब्ध होणार आहे.

3.0 **बुडीत क्षेत्र :-** सरदार सरोवर प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हयातील अक्कलकुवा तालुक्यातील 9 गावे व अक्राणी तालुक्यातील 24 गावे अशी एकूण 33 गावे बाधित होणार असून 6488 हे. वनजमिन व 3111 हे. सरकारी जमिन व खाजगी अशी एकूण 9599 हे. जमिन बुडीत होणार आहे.

4.0 **पुनर्वसन :-** प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसना विषयी महसूल व वन विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते. सरदार सरोवर प्रकल्पामुळे बाधित होणा-या महाराष्ट्रातील बाधित कुटूंबांची संख्या 4227 असून त्यापैकी 1488 खातेदार 814 बिनखातेदार (भूमिहीन) व 1925 सज्ञान मुले/मुली आहेत. 4227 प्रकल्पबाधितांपैकी गुजरात मध्ये 773 व महाराष्ट्रात 3094 अशा एकूण 3867 बाधितांचे पुनर्वसन झाले असून 360 बाधितांचे पुनर्वसन बाकी आहे.

5.0 **नागरी सुविधा :-** महाराष्ट्र राज्यातील सरदार सरोवर प्रकल्पबाधितांसाठी नंदुरबार जिल्हातील अक्कलकुवा, तळोदा,शहादा, तालुक्यातील एकूण 9 गावठाणे सर्व नागरी सुविधांसह विकसित करण्यात आली असून शहादातालुक्यात गावठाण क्र.१० चिखली विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. गावठाण क्र.१ ते १० या ठिकाणी पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधांचा तपशील स्वतंत्र तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

6.0 **सिंचन सुविधा :-** नर्मदा जलविवाद लवादाच्या निर्णयानुसार प्रकल्प बाधितांना सिंचना योग्य शेतजमिनी देणे बंधनकारक आहे. त्यानुसार बाधितांना वाटण्यात आलेल्या जिरायती शेत जमिनीस कुपनलिका, उघडया विहिरी व लघू पाटबंधारे योजनांव्दारे आतापर्यंत एकूण 2178 हे. क्षेत्रास सिंचन सुविधा पुरविण्यात आली असून 1247 हे. क्षेत्रासाठीची कामे प्रगतीपथावर आहेत. याबाबतचा तपशील स्वतंत्र तक्त्यात दाखविण्यात आला आहे.

7.0 **स्थलांतर :-** 4227 कुटूंबांपैकी गुजरात राज्यात 757 व महाराष्ट्रात 2391 कुटूंबे अशी एकूण 3148 कुटूंबे स्थलांतरीत झालेली आहेत.

8 .0 तसेच या विभागामार्फत आतापावेतो नर्मदा खो-यातील अक्कलकुवा तालुक्यात 16 व अक्राणी तालुक्यात 103 असे एकूण 119 पाझर तलावांची रोजगार हमी योजने अंतर्गत कामे पूर्ण करणत आलेली असून अक्राणी तालुक्यातील 8 पाझर तलावांची कामे प्रगतीपथावर आहेत तसेच 10 पाझर तलावांची कामे वन हरकती मुळे अपूर्ण आहेत.